
ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 5 | Issue - 11 | Dec - 2015

Indian Streams Research Journal

# चंद्रपूर–गडचिरोली जिल्हयातील लेणी

डॉ. नलिनी खे. टेंभेकर
सहयोगी प्राध्यापक (इतिहास)
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती

**सारांश–**
अध्यात्म चिंतनासाठी एकांतवास लाभावा म्हणून प्राचिन काळात ऋषी–मुनी अनेकदा डोंगरात नैसर्गिकपणे निर्माण झालेल्या गुहांचा आश्रय घेत. मौर्यकाळात मात्र मुद्दाम डोंगर कोरून गुंफा (लेणी) निर्माण करण्याची प्रथा सुरू झाली. भारतात आज गणना करता येतील अशा सुमारे बाराशेपेक्षा अधिक लेणी आहेत. त्यापैकी नऊ दशांश लेणी एकट्या महाराष्ट्रात आहेत. त्यातील अजिंठा, वेरूळ, कार्ले, भाजे, नाशिक, जुन्नर, एलिफंटा हया गुंफा अखिल भारतात प्रसिद्ध आहेत. विदर्भातही व त्यातल्या त्यात प्रामुख्याने चंद्रपूर – गडचिरोली जिल्ह्यात अनेक गुंफा आहेत मात्र विजासन गुहा सोडल्यास इतर गुंफा शिल्पस्थापत्य व भव्यतेच्या दृष्टीने वैशिष्टयपूर्ण नाहीत. काही गुंफा तर प्रस्तर स्थापत्याची प्राथमिक अवस्था दर्शवितात. कदाचित भारतात गुंफा कोरण्याची ती प्राथमिक अवस्था असावी व उत्तरोत्तर प्रगती होत जाऊन पश्चिम महाराष्ट्रातील लेण्यांसारखी भव्य शिल्पकला कालांतराने उदयास आली असावी असे एक मत मांडण्यात येते. त्या दृष्टीने हया गुंफा अभ्यासनिय आहेत.



**कूट शब्द –**
शैलगृह, लेणी, गुंफा, विजासन, हीनयान, महायान, ब्राम्ही लिपी, सतीस्तंभ, शंखलिपी

## प्रस्तावना :–

स्थापत्य कलेत कोरीव गुंफा किंवा लेण्यांचे स्थान अव्दितीय आहे. ती पाषाणात कोरली असल्यामुळे दिर्घकाळ टिकाऊ वास्तू बनू शकते. सन्याश्यांना लागणारा निसर्गाच्या सानिध्यातील एकांतवास या गुहामधून मिळत असल्याने मौर्य काळात भारतात मुद्दाम डोंगर कोरुन गुंफा किंवा लेणी निर्माण करण्याची प्रथा सुरु झाली. गुंफा स्थापत्य कला रोम, इजिप्त किंवा इराण आणि तुर्कस्थान मधून उगम पावली असे मत मांडले जात असले तरी पूढे गुंफा कोरण्याची कला आत्मसात व परिपक्व करुन निखळ भारतीय तंत्र विकसित झालेले दिसून येते. गुंफा निर्मितीसाठी कलाकारांनी घेतलेले परिश्रम व तत्कालीन तंत्रज्ञान कल्पमातीतच म्हणावे लागते. स्थापत्यकलेचे खास वैषिष्टय म्हणून गुंफा किंवा लेणी वैशिष्टयपूर्ण ठरतात. प्रस्तुत शोधनिबंधात चंद्रपूर–गडचिरोली जिल्हयातील गुंफा व लेणींची माहिती देण्यात येत आहे.

## विजासन लेणी भद्रावती :–

विदर्भातील सर्वात अप्रतिम आणि सौदर्यपूर्ण लेणी म्हणून भद्रावतीची विजासन बौध्द लेणी प्रसिध्द आहे. भद्रावती पासून 3 कि.मी. अंतरावर विजासन नावाच्या टेकडीत ही तीन शैलगृहे कोरली आहेत. प्रसिध्द पुरातत्वज्ञ

कनिंगहॅम याने आपल्या भारतीय पुरातत्वीय अहवालात सर्वप्रथम हया लेणीचा उल्लेख केला आहे[1]. उंच टेकडीच्या मध्यावरती पूर्वाभीमूखी असलेल्या या लेण्यात जाण्याकरीता टेकडीवरील एका अरुंद खिंडीतून जावे लागते येथे उत्तर, पश्चिम व दक्षिण दिशेस प्रत्येकी एक या प्रमाणे तीन लेणी कोरलेल्या असून पूर्व दिशेकडून तिनही लेण्यात प्रवेश करण्याकरिता संयुक्त प्रवेशमार्ग कोरलेला आहे. किंचीत लालसर अशा वालूकापाषाणात ही लेणी कोरलेली आहे. या लेणीत एकसारख्या विशाल आसनस्थ अशा तीन बुद्ध प्रतिमा आहेत.

उत्तर आणि दक्षिणेकडील लेणी आतमध्ये लांबच लांब 20 मी. लांबीचा आणि 2.75 मी. रूंदीचा येण्याजाण्याचा मार्ग कोरून त्यानंतर पूर्वभिमुख लेणी कोरली आहेत.

### उजवीकडील लेणे :–

ही उत्तरेकडील लेणी 14.32 मी. लांब आणि 2.43 मी. उंच आहे. मंडप, अंतराळ व गर्भगृह अशी लेणीची रचना असून मंडपाच्या डाव्या बाजूस एक अपूर्ण भिक्षूगृह आढळून येते. त्यानंतर अतंराळ असून लेणीच्या टोकावर 3.05 मी. लांबीचे गर्भगृह असून या गर्भगृहाचे छत कमानीच्या आकाराचे (गजपृष्ठाकार) आहे. लेणीच्या प्रवेशद्वारापासून ते गर्भगृहाच्या प्रवेशद्वारापर्यंत छत व भिंतीच्या जोडावर तीन समानांतर रेषा आखल्या सारख्या कोरल्या आहेत. गर्भगृहात 158 सेमी. उंच बुद्ध प्रतिमा उच्चासनावर पद्मासनावर ध्यानमुद्रेत विराजमान आहे.

### मध्यवर्ती लेणे :–

विजासन बौद्ध लेणी समूहातील सर्वात मोठे आणि मुख्य असलेले हीनयानी कालखंडातील हे लेणे महायानी कालखंडाच्या प्रारंभी टप्यात परिवर्तीत केले गेले. मंडप, अंतराह व गर्भगृह अशी लेणीची रचना आहे. प्रवेशदाराने आत गेल्यावर 2.74 मी. लांब व 1.22 मी रूंद आकाराचे व सपाट छताचे एक दालन लागते या दालनामागे 10.6 मी लांब आणि 2.44 मी ते 3.05 मी रूंदीचे आणि टोकदार कमानीच्या छताचे आणखी एक दालन लागते. या दालनाच्या डावीकडे 2.58 मी x 2.58 मी आकाराची खोली असून उजवीकडे दोन लहान खोल्या किंवा कक्ष अनुक्रमे 2.41 मी x 0.98 मी. आणि 1.69 मी x 1.06 मी आकारातील आहेत. या खोल्यांमध्ये असलेल्या 45 सेमी. उंचीच्या झोपण्याच्या कट्टयावरून या खोल्या भिक्षुंच्या निवासाकरीता वापरल्या जात असाव्यात. काही अंतर पुढे गेल्यावर 1.41 मी उंचीचे आणि 3.42 मी x 6.42 मी आकाराचे गर्भगृह आहे. गर्भगृहाचे छत सपाट असून त्यात उंच आसनावर पद्मासनात बसलेली दगडी बुद्ध प्रतिमा आहे[2].

या लेणीच्या प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस ब्राम्ही लिपी व प्राकृत भाषेत शिलालेख आहे. पण कालौघात तो नष्ट झालेला आहे. लेण्यात चार चैत्य गवाक्षकृती कोरलेल्या आहेत. ज्यातून प्रवेशाच्या स्वरूपात द्वार कोरलेल्या आहेत.

प्रवेशद्वारापासून प्रतिमागृहापर्यंत लेण्याची एकूण लांबी 22.20 मीटर आहे. हया लेणीच्या डाव्या भागाचे किंवा दक्षिणेकडील बाजुचे छत कमाणीदार आहे. दक्षिणेकडील बाजूच्या उजव्या भिंतीत 1.92 मी x2.48 मी आकाराची लहान खोली आहे. या खोलीचा उपयोग भिक्षूंच्या निवासाकरीता केला जात असावा. मंडपाच्या शेवटी आसान युक्त लहान भिक्षूगृह कोरलले आहे. त्याचा आकार 1.45 मी. लांब, 75 मी रूंद व 1.65 मी. उंच आहे. उजव्या बाजूला हया भिक्षूगृहाच्या समोरील बाजूस अशाच प्रकारचे पण काहीसे मोठे 1.93 मी लांब व रूंद व 1.48 मी उंच असे भिक्षूगृह कोरलेले आहे. या बाजूच्या शेवटी गर्भगृह असून त्यात भव्य व प्रमाणबद्ध दगडी बुद्ध प्रतिमा स्थापित आहे. लेणीच्या प्रवेशद्वारापासून ते मध्यभागापर्यंत दोन्ही बाजूंच्या भिंतीवर तीन रेषा कोरलेल्या आहेत.

### डावीकडील लेणे :–

विजासन बौद्ध लेणी समूहातील सर्वात लहान आकारमानाचे हे लेणे उत्तराभिमूख आहे. मंडप, अंतराळ व गर्भगृह अशी रचना आहे. प्रवेशद्वारापासून प्रतिमागृहापर्यंत लेण्याची लांबी 11.43 मी. आहे. मंडप 5.40 मी. लांब 2.

73 मी रूंद व 2.83 मी उंच असून त्यापुढे अंतराळ आहे. गर्भगृह 2.03 मी लांब, 150 मी रूंद आणि 1.70 मी उंच आहे लेण्यात प्रवेशद्वारयुक्त तीन चैत्य गवाक्षकृती कोरलेल्या आहेत. मंडपात प्रवेशद्वारापासून गर्भगृहापर्यंत भूपृष्ठापासून 1.80 मी अंतरावर तीन समानांतर रेषा कोरलेल्या आहेत. मंडपाच्या उजवीकडे आसनयुक्त भिक्षूगृह कोरलेले आहे. ते 1.90 मी लांब, 0.80 मी रूंद व 1.50 मी. उंच या आकाराचे आहे. बुद्ध प्रतिमागृह आकाराने लहान असून छत सपाट आहे. उंच जोत्यावर 1.50 मी उंचीची पद्मासनात व ध्यानमुद्रेत असलेली बुद्ध प्रतिमा दगडात कोरलेली आहे.

या लेणीत प्रवेश करण्यापूर्वीच दर्शनी भागात दोन्ही बाजूस सुमारे 2 मीटर उंचीवर उत्तरेस पाच आणि दक्षिणेस पाच अशी एकून 10 देवकोष्ठे कोरली आहेत त्यात उत्तरेकडील भागावर दोन स्तूप कोरली आहेत. लेणीच्या दर्शनी भागाच्या पहाडाच्या वरच्या भागात तीन अन्य स्तूप कोरली आहेत. त्यात मधला स्तूप आकाराने मोठा असून स्तूपाचे संपूर्ण अंकन अण्डभाग, हर्मिका, छत्रावली इ.स्पष्टपणे दिसून येतात[3].

हया विजासन लेणीच्या भिंती अंतर्वक्र असून त्या मूळ छताशी किंचीत तिरप्या कोण केलेल्या आहेत व छत गजपृष्ठाकार आहे. येथे स्तंभ कोरलेले नाहीत म्हणून कोरक्यांनी भिंती थोडयाश्या तिरप्या केल्या जेणेकरून तिरप्या भिंती व गजपृष्ठाकार छत यांचा समतोल व चाप–ताण सहन व्हावा आणि छत कोसळू नये हा उद्देश असावा[4].

इ.स. पूर्व दुसऱ्या–पहिल्या शतकात हीनयान काळात भगवतांची पूजा प्रतिक रूपाने (म्हणजे स्तूप, पदकमळ, चक्र, कमळ, इत्यादी) होत होती. विजासन गुंफेत प्रतिक रूपाने अनेक स्तूपांचे अंकन दिसून येते. यावरून ही गुंफा प्रथम हीनयान पंथीय भिक्षुंचे आश्रयस्थान असावी नंतर महायान पंथाच्या प्रभावाच्या काळात गुंफा 10–12 फुट आत पोखरून त्यात दगडातूनच व बौद्ध प्रतिमेची निर्मिती केली गेली असावी. गुंफेचे छत व भिंतीच्या तोंडावर तीन समानांतर रेषा कोरलेल्या आहेत मात्र पुढे भगवान गौतम बुद्धाच्या गर्भगृहात हया रेषा दिसत नाहीत. म्हणजेच महायान काळात गुंफा विस्तारीत करीत असतांना कोरलेल्या त्या रेषा पुढे विस्तारित करणे विसरले असावेत. त्यावरूनच ही गुफा प्रथम हीनयानींची होती नंतर ती महायानींची झाली असली पाहिजे.

इ.स.च्या सातव्या शतकात सुप्रसिद्ध चिनी यात्रेकरू ह्यु–एन–त्संग येथे येऊन गेल्याचा उल्लेख मिळतो. ह्यु–एन–त्संग हयांच्या यात्रावृतांतात ''शहराच्या दक्षिणेकडे थोडया अंतरावर एक प्राचिन संघाराम व अशोक निर्मित स्तूप असून प्राचीन काळात बुद्धाने एक सभा भरवून काही चमत्कार दाखवून नास्तिकांना देखील अनुयायी केले होते व कालांतराने या संघारामात नागार्जुन राहीला होता त्याचा येथील राजा सातापोहोला (सातवाहनाला नाव दिले नाही) यास अतिशय आदर असून त्याने त्याला एक कुटी दान केली होती.'' असा उल्लेख येतो. हे वर्णन सुप्रसिद्ध इतिहासकार अ.ज.राजूरकर यांनी विजासनषी जोडण्याचा प्रयत्न केला आहे.[5] या लेणीस दान देणारा राजा विजय सातकर्णी हा असावा असे ते म्हणतात. विजय सातकर्णी नागार्जुनाचा मित्र होता आणि नागार्जुनास आश्रय देणारा व संघाराम दान देणारा विजय सातवाहन हाच होय असे मत ते मांडतात. आपल्या मताच्या समर्थनार्थ ते इ.स. 1899 मध्ये ब्रम्हपुरी जवळ मिळालेल्या सातवाहन राजांच्या 183 नाण्यांचा उल्लेख करतात. तसेच इ.स. 1941 साली अकोला जिल्ह्यात तऱ्हाळा येथे 1600 नाण्यांचा संच सापडला. पहिल्या व दुसऱ्या संचयात एकुण सहा विजय सातवाहन या राजाची आहेत. या विजयच्या नावावरून या संघरामाचे नाव 'विजयासन' म्हणजे विजयाने दिलेले आसन म्हणजे राहण्याचे ठिकाण असे पडले. त्यानंतर त्या शब्दांचा अपभ्रंश 'विजासन' असा झाला.[6] वरील विवेचनावरून असे दिसून येते की ही लेणी पूर्वीच हीनयानींनी कोरली होती. त्यानंतर विजय सातकर्णीच्या काळात महायान पंथाचा प्रभाव वाढून लेणीचे स्वरूप महायानी झाले. विजय सातकर्णीने लेणीत थोडाफार बदल करून बौद्ध भिक्कूस दान दिली असावी.

वरील पुराव्यावरून ही लेणी हीनयान काळात इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात कोरली असावी आणि नंतर इ.स. दुसऱ्या शतकात सातवाहन काळात येथे बुद्ध प्रतिमा कोरून तिचे रूपांतरण महायानी करण्यात आले[7].

## प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील शैलगृह भद्रावती :–

1995 ला स्थानिक लोकांनी गाळ काढल्यामुळे ही शैलाश्रये उजेडात आलीत. 19 X 15 मी आकाराच्या वालुका पाषाणात उतरत्या दरडीचा उपयोग करून तीन गुंफा तळघरासारखी कोरली आहेत. प्रथम शैलगृहासमोर प्रशस्त अंगणाची निर्मिती केली आहे ते आकाशानुबंध (Open to sky) असून नंतरच्या पाषाणास आडवा कापून एक मोठे दालन कोरण्यात आले आहे. त्याचे छत तळभागाच्या तुलनेत ओबडधोबड आहे.

या दालनाच्या आत जाण्यास प्रवेशमार्ग असून समोर 2.75X2.50 मी आकाराचे तीन कक्ष आहेत. यातील एका शैलकक्षात 1.75X1 मिटर आकाराची रौद्र भावातील देवीची (शक्ति) प्रतीमा कोरली आहे. देवी दशभूजा असून पद्मपीठात प्रेतासनावर बसली आहे. पादपोठाखाली राक्षस पालथा पडलेला स्पष्टपणे दिसून येतो. स्थानिक लोक हया प्रतिमेस दुर्गा–भवानी या नावाने ओळखतात. काही विद्वानांच्या मते ती चामुंडेची मूर्ती होय[8]. याच मूर्तीच्या बाजूला चर्तुभूज शिवाचे शिल्प आहे. ही गुंफा शैव संप्रदायाशी संबधीत आहे.

दुसऱ्या गुंफेत भैरवाचे शिल्प कोरले असून तो द्विहस्त व संपादात उभा आहे. भैरवाच्या पादपिठावर कुत्रा कोरलेला आहे. त्याच्या एका बाजूला चामुंडा कोरलेली आहे. तिचे शरीर हळकुळी, सापळायुक्त कंकाल आणि चेहरा अत्यंत रौद्र असून तिने मस्तकावर नागबंध मुकुट परिधान केले आहे.[9]

तिसऱ्या गुंफेत शिवलिंग आणि शिव–पार्वती प्रतिमा आहे. तसेच 30 पादुका पट कोरलेली शिला येथेच आहे. समोरच्या अंगणात बुद्धशिर्ष, विष्णु, गणेश, शिव अशा भग्न मूर्ती ठेवलेल्या आहेत. हया सर्व शैवलेणी असून इ.स. 6 वे 7 वे शतक त्यांच्या निर्मितीचा काळ असावा.

## भटाळा लघुलेणी समुह :–

भटाळा हे गाव नागपूर–चंद्रपूर महामार्गावर वरोडा हया तालुक्याच्या ठिकाणापासून 20 किमी. अंतरावर असलेल्या सालोरी गावाच्या फाट्यापासून उत्तरेस 5 किमी अंतरावर आहे. गाव तिन्ही बाजूंनी लहान लहान डोंगर–रागांनी व्याप्त असून तेथे दोन मोठे तलाव आहेत. येथे तीन समुहात एकुण 20 शैलगृहे कोरली आहेत. एक लेणी समुह भटाळा गावापासून 1 किमी दक्षिणेस असलेल्या ऋषीटाके या तलावाभोवती काही पहाडात तर काही शैलगृहे ही वेगळया एकाश्मात कोरली आहेत ही संख्येने तेरा आहेत. दुसरा समुह हा भवानी मंदीर आणि किल्ला यामध्ये भटाळा गावाच्या दक्षिणेस कोरला आहे. हया समुहातील तीन शैलगृहे ही तलावाच्या नैसर्गीक भिंतीत कोरली आहेत तर दोन भवानी मंदीराच्या दक्षिणेस कोरली आहेत. या समुहात एकुण पाच गुफा आहेत. तिसरा लेणी समुह भटाळा गावाच्या पश्चिमेस आणि स्थानिक तलावाच्या दक्षिणेस असलेल्या टेकडीच्या पायथ्याशी कोरले आहे. यात दोन लेणी आहेत. एकाश्मात तथा पहाडात कोरलेल्या हया लहान–लहान आकारातील वालुका पाषाणातील लेणी तत्कालीन मंदिराच्या लहान प्रतिकृतीच वाटतात. तसेच शैलगृहातील मूर्ती शिवाय अन्य कलाकुसरीचे काम केल्याचे येथे दिसून येत नाही. उपरोक्त लेण्यांमध्ये पाच लेण्यांत लिंगपिंड, दोन लेण्यात नरसिंह प्रतिमा दोन लेण्यात सुर्यमूर्ती, दोन लेण्यात महिषासुर मर्दिनीची प्रतिमा व प्रत्येक एक लेण्यांत क्रमशः विष्णू, गणपती, वेटोळे घातलेला नाग आणि शिव प्रतिमा कोरलेली आहे. उरलेल्या दोन लेणी मूर्तीविरहीत व तीन गाळाने भरलेल्या आहेत[10]. येथील प्रतिमा शिल्पशैलीवरून आणि लेण्यांच्या वैशिष्ट्यांवरून येथे इ.स. 4–5 व्या शतकापासून ते इ.स. 7–8 व्या शतकापर्यंत लेणी कोरल्या गेल्याचे स्पष्ट होते. त्यातही शिव, विष्णू व सुर्य प्रतिमा वाकाटक कालीन असून गाणपत्य आणि शाक्त प्रतिमा राष्ट्रकूट कालीन असाव्यात.

## गवराळा लेणी ता. भद्रावतीः–

भद्रावतीच्या दक्षिणेस तीन किमी. अंतरावर गवराळा हे लहानसे खेडेगाव आहे. स्थानिक आसन तलावाच्या किनाऱ्यावर, वरदविनायक टेकडिच्या पायथ्याशी एका शैलगृहात लहान लहान आकारातील देवकोष्टे कोरली आहेत[11]. कनिंगहॅमच्या पुरातत्व सर्वेक्षण अहवालात येथील आसन तलावाच्या किनाऱ्यावर अनेक मंदिर अवशेष व

दोन गुंफा असल्याचे नमूद केले आहे. तसेच या लहान आकारातील देवकोष्टांना कोंबडयांचे घर म्हणून ओळखले जात होते असा उल्लेख करतात[12]. परंतु ह्यास एक कक्षाची शैलगृहे म्हणजे संयुक्तीक ठरेल. येथील विष्णु, वराह, त्रिविक्रम, नरसिंह इत्यादी प्रतिमांच्या घडणीवरून ही शैलगृहे इ.स. 4–5 व्या शतकातील ठरतात. दुसरी एक गुंफा कोनाडयासारखी सदर गुंफेजवळ कोरली आहे. ती पूर्व–पश्चिम 2.65 मी आणि उत्तर–दक्षिण 1.50 मी. आकाराची आहे. यात अधिष्ठान असून त्यावर आठ देवतांची स्थापना केली होती. परंतु आज अधिष्ठान रिकामे असून मूर्ती काढल्यानंतरच्या खोबण्या मात्र तेथे आहेत. परंतु हयाच शैलगृहातील दक्षिण व पश्चिमेकडील भिंतीवर डावीकडून अनुक्रमे देवकोष्टात त्रिविक्रम, नरसिंह, शिवलिंग, शेषशाई विष्णू आणि वराह अशी पाच शिल्पे कोरली आहेत. या गुफेतील शिल्पावरून ही वैष्णवपंथी लेणी होय. येथे विष्णूचे अनेक अवतार कोरून त्यांचे पूजन केले जात असावे.[13]

**देऊळवाडा गुंफा :–** भद्रावतीच्या दक्षिण–पश्चिमेस 11 कि.मी अंतरावर देऊळवाडा हे गाव आहे. गावाच्या मागे पहाडाच्या खोबणीत 5–6 निकृष्ट दर्जाच्या कृत्रिम गुंफा वालूका पाषाणात कोरलेल्या आहेत.

**शैलगृह क्रमांक 1 –** यात दोन कक्ष असून गावाच्या दक्षिण पश्चिमेला तलावाच्या बाजूने नव्याने बांधलेल्या हनुमान मंदिराच्या बाजूस कोरलेली आहेत. गंफा दोन कक्षाची असून गर्भगृहाचे कक्ष 1.60X1.40 मी लांबी रूंदीचे असून उंची 1.40 मी आहे. तर दुसरे पडवीवजा कक्ष 1.80X1.40 मी लांबी रूंदीचे व 1 मीटर उंचीचे आहे. या कक्षास ओबडधोबड असे चौकोनी स्तंभ आहे. गर्भगृहात नागशिल्प कोरले आहे. दर्शनी कक्षाच्या उजव्या बाजूच्या भिंतीत चौकोनी कोनाडा आढळून येतो.

**शैलगृह क्रमांक 2 –** ही गुंफा पहिल्या गुंफेच्या उत्तर बाजूस लागून असून दोन कक्षांची आहे. गर्भगृह 1.75X1.15 मी आकाराची असून उंची 1.15 मी आहे. यातील पुढील कक्ष 2मी X 1.35 मी आकारात असून त्यात डाव्या बाजूला अस्पष्ट असलेला शंख लिपितील लेख आढळतो. या कक्षामध्ये उजव्या बाजुच्या भिंतीत एक चौकोनी कोनाडा कोरलेला आढळतो. सम्राट हर्षवर्धन आपल्या नावाची आद्याक्षरे शंखलिपीत लिहीत असे, तशी अक्षरे हया गुंफेत कोरलेली असल्याने ही गुफा 6 व्या 7 व्या शतकातील असावी.[14]

श्री. हिरालाल यांनी आपल्या 'इन्स्क्रीप्शन इन दि सेन्ट्रल प्रोव्हीन्सेस ॲन्ड बेरार' या ग्रंथात शंखलिपी लेख भद्रावती येथे असल्याचे नमूद केले आहे. परंतू प्रस्तुत लेख भद्रावतीला नसुन तो देऊरवाडा येथील शैलगृहात आहे.[15]

### शैलगृह क्रमांक 3, शैलगृह क्रमांक 4 व शैलगृह क्रमांक 5 –

एकाच कक्षाचे असून गुफाच्या भिंती निकृष्ट स्वरूपाच्या आहेत. क्रमांक 5 च्या गुंफेच्या प्रवेशद्वारावर पंचारती घेतलेल्या एका स्त्रीची अगदी लहान प्रतिमा कोरलेली आढळते.

### शैलगृह क्रमांक 6 –

या समूहातील सर्वात मोठी गुंफा आहे. या गुफेस 'नरसिंह' गुंफा म्हणून ओळखले जात असले तरी नरसिंहाची प्रतिमा येथे आज नाही. ही गुंफा भुयारीप्रमाणे अरूंद असून बराचसा भाग नैसर्गिक असा बनलेला आहे. या गुंफेची लांबी 10.55 मी असून रूंदी केवळ 1.40 मी आहे. गुंफेच्या मुखाशी 2X2 मी आकाराचा लहान कक्ष आहे या लेणी यात्रेकरू, भिख्खू, प्रवासी व्यापारी यांच्या निवास स्थानाकरीता कोरल्या असाव्या.

### कुनघाडा येथील शैलगृहे –

चंद्रपूर जिल्हातील नागभीड तालुक्यात मोहाळी (मोकासा) हया गावापासून पश्चिमेस 2 किमी. अंतरावर एक गुंफासमुह असून कुनघाडा नावाचे गाव जवळ असल्याने हया दोन्ही गावाच्या नावाने हा गुंफा समूह ओळखला जातो. स्थानिक मंडळी यास पांडव गुंफा असेही म्हणतात. या गुंफापैकी क्रमांक दोन ची गुंफा महत्वाची आहे. या गुंफेस एक स्तंभ असून स्तंभामूळे ही गुंफा व्हरांडा व अंर्तकक्ष अशा दोन भागात विभाजित झाली आहे.

या शैलगृहाच्या पहिल्या कक्षाचा आकार पूर्व–पश्चिम 1.74 मी व उत्तर–दक्षिण 2.70मी असा आहे. दुसरे कक्ष पूर्व–पश्चिम 2 मी व उत्तर–दक्षिण 3.10 मी व उंची 1.50 मी आहे. पहिल्या कक्षाच्या पश्चिमेकडील आतील भिंतीवर 13 अक्षरे कोरलेली असून ती अक्षरे ब्राम्ही लिपीतील आहेत. क्रमांक चारचे शैलगृह सुद्धा याच आकारातील आहे. गुंफा क्र. 1,3 व 5 ही 2X3.10 मी. आकारातील असून साधी शिल्पविहीन आहेत. गुंफांची द्वारे अंतर्वक्र आहेत. यातील दोन गुंफा पश्चिमेकडे प्रवेशद्वार असलेली आहेत. हया शिलालेखाचे वाचक पुरातत्ववेत्ते श्री. र. रा. बोरकर यांनी ''शिव स्वामी पुतस ग्रामे पमई'' असे केले. याचे मराठी भाषांतर ''शिवस्वामीचा मुलगा पमई गावचा असा होतो.''अक्षररचेनवरून हया गुंफा सातवाहन काळातील इ.स. च्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकातील असाव्यात.[16] शिलालेखावरून शिवस्वामी नामक व्यक्तीच्या पुत्राने जो प्रमई गावचा आहे त्याने हे लेणे आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ किंवा पुण्य संपादन करण्यासाठी कोरले असावे असे म्हणता येते. त्याने गुंफासमुह कोरवून बौद्ध भिक्षूसंघास अर्पण केला असावा.

## घुग्गुस लेणी –

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस तालुक्याच्या पश्चिमेस सुमारे 1 कि.मी.अंतरावर तीन एकश्मात कोरलेल्या तीन गुंफा आहेत. त्यापैकी एका गुंफेत भैरवाची मूर्ती कोरली आहे.[17] या गुंफा एका कक्षाच्या असून त्या 2.10X2.10 मी लांबी रूंदीच्या आणि 1.40 मी उंचीच्या आहेत. क्रमांक तीनची गुंफा 2.60X1.50 मी लांबी रूंदी ची असून प्रवेशद्वार केवळ 40 सेमी उंचीचे आहे. एकुनच ही शैलगृहे बोळक्यासारखे दगडात कोरलेले साधे कोनाडेच वाटतात. ही लेणी इ.स. 7–8 व्या शतकातील साधू, सन्याशी किंवा श्रेष्ठी, प्रवासी यांच्या निवाऱ्यासाठी कोरली असाविंत असे एक मत आहे. तर बाजूच्या एका उंच चौकोनी स्तंभावर एका स्त्रिचा ढोपरापासून आडवा हात असून त्यावर बांगडया आहेत व स्तभांच्या वरच्या भागास चंद्र सुर्याचे अंकन आहे. हा सती स्तंभ असल्याने गुंफा कोरण्याचा हेतू काहीतरी वेगळा असावा. कदाचित मृत व्यक्तिंचे अस्थिकलश अशा बोळभेवजा गुंफामध्ये ठेवले जात असावेत सा विचारही मांडला गेला आहे.[18]

## माना टेकडीतील गुंफा, चंद्रपूर–

चंद्रपूर शहरास असलेल्या परकोटाच्या पठाणपूरा दरवाज्याच्या दक्षिणेस सुमारे 1 किमी. अंतरावर झरपट नदीच्या काठावर माना नावाने प्रसिद्ध असलेल्या टेकडीत एक लेणी समुह असून त्यात पाच लेणी होत्या. आज त्या चारच आहेत व साध्या पद्धतीने वालूका पाषाणात कोरली आहेत. केवळ क्रमांक एकच्या शैलगृहाच्या प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूस एक–एक कमळ आणि देवकोष्ठ कोरले आहेत. क्रमांक दोनच्या प्रवेशद्वारावर फक्त कमळ आणि तीनच्या शैलगृहात अधिष्ठान व अपूर्ण देवकोष्ट कोरले आहे. याशिवाय अन्य अलंकरण नाही. क्रमांक एकचे शैलगृह हे 2.50 X 2.50 मी आकाराचे असून 2 मी उंच आकारात कोरले आहे. क्रमांक दोन, तीन, व चार ही शैलगृहे सुद्धा समान आकाराची आहेत. या लेणी बौद्ध भिक्षु किंवा प्रवाशांच्या व्यापाऱ्यांच्या विश्रांतीस्थानाकरिता इ.स. दुसऱ्या–तिसऱ्या शतकात कोरण्यात आल्या असाव्या.

## निष्कर्ष –

चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात इ.स. पूर्व तिसऱ्या–दुसऱ्या शतकात लेणी कोरण्यास प्रारंभ होऊन हे कार्य 7–8 व्या शतकापर्यत चालु होते. भद्रावती येथील विजासन बौद्ध लेणी प्रथमतः हीनयानींनी कोरली नंतर महायान पंथाच्या उत्कर्ष काळात हया लेणीत सुधारणा करण्यात येऊन बौद्ध मूर्ती कोरण्यात आली असे दिसून येते. यावरून वरील दोन्ही जिल्ह्यात हीनयान व महायान दोन्ही पंथाचा मोठया प्रमाणावर प्रसार होता असे दिसून येते. देऊळवाडा, कुनघाळा, घुग्गुस, माना येथील लेणी बौद्ध भिक्षूंच्या निवासाकरीता कोरली गेली असावी किंवा प्रवासी, यात्रेकरू, व्यापारी इत्यादींच्या निवासासाठी त्यांचा वापर होत असावा. भटळा, गवराळा आणि भद्रावती येथील

प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील लेणीवरून 4–5 व्या शतकापासून ते सहाव्या–सातव्या शतकात या जिल्ह्यामध्ये शैव, वैष्णव, गाणपत्य व शाक्त संप्रदायाचा प्रसार होता हे स्पष्ट होते. मात्र शिल्प व स्थापत्याच्या दृष्टीने विजासन लेणी सोडल्यास इतर लेणी निकृष्ठ दर्जाच्या आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची :–

1) कनिंगहॅम, ए ऑर्किऑलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया रिपोर्ट, खंड– 9, 1879, पृष्ठ – 221

2) डॉ. मेश्राम प्रदिप, विदर्भातील बुद्ध धम्माचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, ऑगस्ट 2007, पृष्ठ क्र. 73–74

3) बोरकर र.रा. चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व, सुयश प्रकाशन नागपूर, 2009 पृष्ठ क्र. 161

4) चितळे श्री. के. विदर्भातील कोरीव गुंफा (पर्यटन), प्रभूकृपा प्रकाशन, महाल नागपूर, 2002, पृष्ठ क्रमांक –95, 96

5) राजूरकर, अं.ज., चंद्रपूरचा इतिहास, हरिवंश प्रकाशन, पूर्णमुद्रण 2005, पृष्ठ क्रमांक – 34 ते 36.

6) राजूरकर, अ.ज. उपरोक्त पृष्ठ – 37

7) बोरकर र.रा. चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व, सुयश प्रकाशन नागपूर, 2009 पृष्ठ क्र. 162

8) चितळे श्री. के. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिकांक, लेख, विदर्भातील भांदकचे शैलगृह–एक पुर्नविचार, 1996, पृष्ठ – 128

9) बोरकर र.रा. चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व, सुयश प्रकाशन नागपूर, 2009 पृष्ठ क्र. 163

10) बोरकर र.रा. श्री शहाजी छत्रपती स्मृतीग्रंथ, चंद्रपूर – गडचिरोली जिल्ह्यातील वाकाटकालीन स्थापत्य 1987 पृष्ठ 78–80

11) चंद्रपूर डिस्ट्रीक्त गॅझीटिअर–महाराष्ट्र राजय मुंबई, 1977 पष्ठ क्र. 760

12) कनिंगहॅम ए. ऑर्किऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया रिपोर्ट, 1873–74, पृष्ठ 133–134

13) बोरकर र.रा. चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व, सुयश प्रकाशन नागपूर, 2009 पृष्ठ क्र. 168

14) चितळे श्रीपाद– विदर्भातील कोरीव गुंफा (पर्यटन), प्रभूकृपा प्रकाशन, महाल नागपूर, 2002, पृष्ठ क्रमांक –109

15) डॉ. मेश्राम प्रदिप, विदर्भातील बुद्ध धम्माचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, ऑगस्ट 2007, पृष्ठ क्र. 77

16) बोरकर र.रा. चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व, सुयश प्रकाशन नागपूर, 2009 पृष्ठ क्र. 164

17) चंद्रपूर जिल्हा गॅझेटियट– महाराष्ट्र राज्य मुंबई, 1977 पृष्ठ – 760

18) चितळे श्रीपाद– विदर्भातील कोरीव गुंफा (पर्यटन), प्रभूकृपा प्रकाशन, महाल नागपूर, 2002, पृष्ठ क्रमांक –107